MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात



बीड शहरातील जिजामाता उद्यान येथे राजमाता जिजाऊ माँसाहेब जन्म उत्सवानिमित्त मा.आ.संदीपभैया क्षीरसागर,राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष मा.राजेंद्र मस्के यांनी उपस्थित राहुन अभिवादन केले.

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -११७ | रविवार दि.१२ जानेवारी २०२५ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रु | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -117 | SUNDAY DT.12 JANUARY 2025 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# बीड जिल्हा पुन्हा हादरला!

## सरपंच अभिमन्यू क्षीरसागरांचा अपघाती मृत्यू

बीड /प्रतिनिधी

राखेची वाहतूक करणाऱ्या टिप्परच्या धडकेत बीडमध्ये पुन्हा एकदा एका सरपंचाला आपला जीव गमवावा लागला आहे. परळी तालुक्यातील सौंदनाचे सरपंच अभिमन्यू क्षीरसागर यांचा अपघातातध्ये मृत्यू झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार परळी तालुक्यातील मिरवट फाट्यावर शनिवारी (काल) रात्री हा अपघात झाल्याची माहिती आहे. राखेची वाहतूक करणाऱ्या टिप्परने दुचाकीवरील सरपंचाला उडवले. यात अभिमन्यू क्षीरसागर यांचा मृत्यू झाला

टिप्पर चालकाने काढला पळ

सैंदाना गावाचे सरपंच अभिमन्यू क्षीरसागर यांना राखेची वाहतूक करणाऱ्या टिप्परने उडवले, त्यामध्ये त्यांचा जागीच मृत्यू झाला. टिप्पर चालकाने अपघातस्थळावरून पळ काढल्याचे स्थानिकांनी सांगितलेय. या अपघातानंतर बीडमधील राखेचे अर्थकरण चर्चेत आले आहे. हा अपघात आहे की घातपात याचा आता पोलीस तपास करत आहेत. या घटनेनंतर परळीतील राखेचे अर्थकारण पुन्हा चर्चेत आले आहे. या परिसरातील ८ ते ९ गावांना प्रदूषणाचा फटका बसला आहे. शेतातील पिकांसह ओढ्यातील पाणी सुद्धा राखमय झाले आहे. त्याविरोधात काही सरपंचांनी विरोध केला होता.

..तरीही राखेचे टिप्पर बंद नाहीत- धस

परळीत तालुक्यात राखेची वाहतूक करणाऱ्या एका टिप्परने सरपंचाला चिरडल्याची घटना घडली आहे. या घटनेवर भाजप आमदार सुरेश धस यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली. चोंढवाना गावच्या सरपंचाचा खात्मा करण्यात आला आहे, असा दावा त्यांनी केला. परंतु हा घातपात आहे की अपघात आहे, हे अजून सिद्ध झाले नाही, त्याचा तपास करावा, असेही सुरेश धस म्हणाले. महाराष्ट्रात परळीची भयानक चर्चा सुरू असून देखील राखेचे टिप्पर बंद नाहीत. आजही राखेच्या टिप्परची अवैध वाहतूक सुरू आहे. या सर्व प्रकाराला परळीचे पोलिस आणि थर्मल पावरचे अधिकारी, कर्मचारी जबाबदार असल्याचा आरोपी भाजप आमदार सुरेश धस यांनी केला.



शेतातून घरी जाताना राख वाहतूक करणाऱ्या टिप्परने उडवले

# हार्वेस्टर अनुदान घोटाळ्यात दोन्ही आका सहभागी

## सुरेश धसांचा वाल्मीक कराड अन् धनंजय मुंडेवर निशाणा, शेतकऱ्यांना मारहाण केल्याचा दावा

चोंढवाना गावच्या सरपंचाचा खात्मा करण्यात आला आहे, असा दावा त्यांनी केला. परंतु हा घातपात आहे की अपघात आहे, हे अजून सिद्ध झाले नाही, त्याचा तपास करावा, असेही सुरेश धस म्हणाले. तसेच हार्वेस्टर मशीन घोटाळ्यात दोन्ही आका सहभागी असल्याचा दावा सुरेश धस यांनी केला आहे. शेतकऱ्यांची फसणवूक केली असून पैसे परत मागणाऱ्या शेतककऱ्यांना मारहाण करण्यात आली, असेही ते म्हणाले.

परळीत तालुक्यात राखेची वाहतूक करणाऱ्या एका टिप्परने सरपंचाला चिरडल्याची घटना घडली आहे. या घटनेवर भाजप आमदार सुरेश धस यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली. यासोबतच त्यांनी हार्वेस्टिंग मशीन अनुदान फसवणूक प्रकरणावर भाष्य करत धनंजय मुंडे आणि वाल्मीक कराड यांच्यावर हल्ला चढवला.चोंढवाना गावच्या सरपंचाचा खात्मा करण्यात आला. हा घातपात आहे की अपघात, याचा तपास करावा लागेल. महाराष्ट्रात परळीची भयानक चर्चा सुरू असून देखील राखेचे टिप्पर बंद नाहीत. आजही राखेच्या टिप्परची अवैध वाहतूक सुरू आहे. या सर्व प्रकाराला परळीचे पोलिस आणि थर्मल पावरचे अधिकारी, कर्मचारी जबाबदार असल्याचा आरोप भाजप आमदार सुरेश धस यांनी केला.





### इतर जिल्ह्यांतूनही हा घोटाळा समोर येईल

वाल्मीक कराडने ऊसतोडणी यंत्रासाठी अनेकांकडून पैसे घेतलेत. १४१ शेतकऱ्यांना हार्वेस्टर मशीन द्यायच्या होत्या. या लोकांनी २ ते ५ हजार लोकांकडून प्रत्येकी ८ लाख रुपये जमा केले. परंतु केवळ १४१ शेतकऱ्यांना हार्वेस्टर मशीन दिल्या. या प्रकरणात पंढरपूर तालुक्यात पहिला गुन्हा दाखल झाला. अशाप्रकारचे गुन्हे आता कोल्हापूर, पुणे बीडमध्ये दाखल होतील, असा दावा सुरेश धस यांनी केला. अनेक लोकांकडून ८ लाख रुपये घेतले असून पैसे घेतले यासाठी पुराव्याची गरज नाही, कारण मीडियासमोर ते पुरावे दिलेले आहेत, असे सुरेश धस म्हणाले.

## परळी ग्रामीण पोलिसांनी २ लाखांचा गुटखा पकडला

बीड ।प्रतिनिधी

होन्डाई क्रेटा गाडीमध्ये गुटखा जात असल्याची माहिती परळी पोलिसांना झाल्यानंतर पोलिसांनी या गाडीची झाडाझडती घेतली असता त्यात २ लाख रूपयांपेक्षा जास्त किंमतीचा गुटखा आढळून आला या प्रकरणी पाच आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

होन्डाई क्रेटा कार क्र. एम.एच ३८. झेड. २१२१ या गाडीमध्ये गुटखा जात असल्याची माहिती परळी ग्रामीण पोलिसांना झाल्यानंतर पोलिसांनी गाडीची झाडाझडती घेतली असता त्यात मोठ्या प्रमाणात गुटखा आढळुन आला या गुटख्याची किंमत २ लाखांपेक्षा जास्त आहे. या प्रकरणी आरोपी रहेमत अली कटूमियों सय्यद, हकीम कुरेशी, अजिम लाला कुरेशी, मतीन समदानी शेख, अनंत मुंजाजी फळे (रा.सर्व परळी) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा दुर्घटना प्रकरणी जयदीप आपटेला जामीन मंजूर



मालवण ।प्रतिनिधी

मालवण येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याप्रकरणी शिल्पकार जयदीप आपटेला उच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. या प्रकरणाचा तपास पूर्ण झाला असून, आता आपटेला कोठडीत ठेवण्याची गरज नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे.तसेच, दुर्घटनेत कोणीही जखमी झालेले नसल्यामुळे हत्येचा प्रयत्न केल्याचे कलम याप्रकरणी लागू शकत नाही, असेही न्यायालयाने नमूद केले आहे.

न्या. नितीन बोरकर यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला आहे. राजकोट किल्ला परिसरात शिवरायांचा पुतळा २६ ऑगस्ट २०२४ मध्ये कोसळला होता. अवघ्या आठ महिन्यांतच पुतळा कोसळल्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रातून संताप व्यक्त करण्यात येत होता. या घटनेनंतर पुतळ्याचे बाधकाम निकृष्ट असल्याचे उघड झाले होते. पुतळा दुर्घटनेप्रकरणी शिल्पकार जयदीप आपटे याला कल्याण येथून अटक करण्यात आली होती.

# वाल्मीक कराडच्या मुलाचेही कारनामे


## रिव्हॉल्व्हरचा धाक दाखवून ट्रक, कार, प्लॉट बळकावला

संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी अटक असलेला 'आका' वाल्मीक कराड कोठडीत असताना त्याचा मुलगा सुशील कराडही अडचणीत आला आहे. सुशील कराडने त्याच्या ट्रेडर्समधील जुन्या मॅनेजरला मारहाण करून रिव्हॉल्व्हरचा धाक दाखवून दोन ट्रक, दोन कार आणि प्लॉट बळकावल्याचा आरोप आहे.याप्रकरणी बीड आणि सोलापूर पोलिसांनी सुशील कराडविरुद्ध साधी फिर्यादही दाखल करून घेतली नाही. त्यामुळे मॅनेजरच्या पत्नीने सोलापूर जिल्हा सत्र न्यायालयात धाव घेऊन खासगी फिर्याद दाखल केली आहे.

आता त्याचा मुलगा सुशील कराडचा कारनामा उघड झाला आहे. तक्रारदार महिला, तिचे पती आणि त्यांची दोन मुले परळी येथे राहण्यास होती. महिलेचा पती सुशील कराडच्या ट्रेडर्समध्ये मॅनेजर म्हणून काम करत होता. त्यांच्याकडे दोन बल्कर ट्रक, दोन कार, दोन दुचाकी व प्लॉट होता. मात्र, सुशील कराडने एवढे कसे काय तुम्ही कमावले? असे म्हणत महिलेच्या पतीला मारहाण करीत रिव्हॉल्वरचा धाक दाखवला. दोन बल्कर ट्रक, दोन कार, दोन दुचाकी आणि प्लॉट बळकावला. कोणतेही पैसे दिले नाहीत. अनिल मुंडेच्या नावावर ही सर्व खरेदी केली. अडीच तोळे सोनेही बालाजी टाक ज्वेलर्सला विकायला लावले आणि सुशील कराडने पैसे घेतले, असे न्यायालयात दाखल केलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.

बीड, सोलापूर पोलिसांनी फिर्याद दाखल करून घेतली नाही

सुशील कराड विरोधात मॅजेनरच्या पत्नीने सोलापूर एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती; पण येथे फिर्याद दाखल करून घेतलीच नाही. सोलापूर पोलीस आयुक्त, बीड पोलीस अधिक्षक यांच्याकडेही रजिस्टर पोस्टाने तक्रार दाखल केली, पण सुशील कराडविरुद्ध कारवाई झाली नाही.



### ड्रग्जच्या तस्करीतील आरोपी सोबत मुंडेंचे फोटो

अलीकडेच पाकिस्तानातून आलेले १७३ किलो ड्रग्ज सापडले. आंतरराष्ट्रीय बाजारात याची किंमत ८९० कोटींचे आहे. या प्रकरणातील आरोपी कैलास सानप, दत्ता आढळे यांचे धनंजय मुंडे यांच्यासोबतचे फोटोच धस यांनी आज झळकावले.

# सुरेश धसांनी बीडला बदनाम केलंय


## संतोष देशमुख हत्या प्रकरणावरून पंकजा मुंडे यांचा घणाघात

बीड : माजी सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणामुळे बीडमधील नागरिकांमध्ये धगधगती आग पेटली आहे. या प्रकरणात न्याय मिळवण्यासाठी राजकीय नेते देखील मैदानात उतरले आहेत. काही नेत्यांनी आरोप प्रत्यारोप केले.भाजप आमदार सुरेश धस यांनी या प्रकरणात आक्रमक भूमिका घेतली असून, त्यांनी राज्य पिंजून काढलंय. तसेच आमदार धनंजय मुंडे यांच्यावर देखील आरोप केले. अशातच सुरेश धस यांनाच मंत्री पंकजा मुंडे यांनी लक्ष्य केलं आहे.सुरेश धस यांच्यामुळे बीड बदनाम झालंय, अशा शब्दात मंत्री पंकजा मुंडे यांनी सुरेश धस यांच्यावर टीकेची तोफ डागली. हे प्रकरण संवेदनशील पद्धतीने हाताळता आले असते. असंही पंकजा मुंडे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना प्रतिक्रिया दिली आहे.

कुणाच्याही प्रश्नांवर उत्तर द्यायचं कारण नाही. मस्साजोग प्रकरणात एसआयटी पथक नेमा, अशा आशयाचे पत्र मी दिलं आहे. असं माजी सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात पंकजा मुंडे म्हणाल्या आहेत.तसेच, कोणतीही गोष्ट घडल्यावर काही नेत्यांना राजकारण करायचं असतं. असा अप्रत्यक्ष आरोपीही पंकजा मुंडे यांनी केला आहे. सुरेश धस यांच्यामुळे बीड बदनाम झालं आहे. या घटनेची ज्या पद्धतीने मांडणी झाली. त्यामुळे बदनामी बीड बदनाम झालं असल्याची खळबळजनक आरोप पंकजा मुंडे यांनी सुरेश धस यांच्यावर केला आहे.

बीडमधील प्रकरण संवेदनशील पद्धतीने हाताळता आले असते. बीडचे नागरिक स्वाभिमानी आहेत.





## अभिनेता अल्लू अर्जुनला मोठा दिलासा

हैद्राबाद : पुष्पा २ चित्रपटाच्या प्रीमियरदरम्यान झालेल्या चेंगराचेंगरी प्रकरणात हैदराबादच्या नामपल्ली न्यायालयाने अभिनेता अल्लू अर्जुन याला मोठा दिलासा मिळाला आहे. त्याला दर रविवारी चिक्कडपल्ली पोलिस स्टेशनमध्ये उपस्थित राहण्यापासून सूट देण्यात आली आहे. तसेच त्याला विदेशात जाण्याची परवानगीही दिली. ४ डिसेंबर २०२४ रोजी हैदराबादमधील संध्या थिएटरमध्ये अल्लू अर्जुनला पाहण्यासाठी मोठी गर्दी जमली होती तेव्हा चेंगराचेंगरी झाली होती. जेव्हा अभिनेता त्याच्या गाडीतून उतरला आणि चाहत्यांचे स्वागत केले तेव्हा परिस्थिती आणखी बिकट झाली. यानंतर तिथे गोंधळ उडाला. या घटनेत एका ३५ वर्षीय महिलेचा मृत्यू झाला आणि तिचा आठ वर्षाचा मुलगा गंभीर जखमी झाला आणि तो अजूनही रुग्णालयात दाखल आहे.

# रवींद्र चव्हाण महाराष्ट्र भाजपच्या कार्याध्यक्षपदी

## दोन महिन्यांनी प्रदेशाध्यक्ष होणार

मुंबई : भारतीय जनता पक्षाचे प्रदेश अधिवेशन रविवारी शिर्डीत होत असतानाच पक्षाच्या प्रदेश कार्याध्यक्षपदी माजी मंत्री रवींद्र चव्हाण यांची नियुक्ती करण्यात आली. प्रदेशाध्यक्षपदी तूर्तास चंद्रशेखर बावनकुळे कायम राहणार असले तरी दोन महिन्यांनी संघटनात्मक निवडणुकीनंतर चव्हाण पूर्णवेळ अध्यक्ष होतील.

चव्हाण हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्ती मानले जातात. राज्य मंत्रिमंडळात त्यांचा समावेश झाला नव्हता, तेव्हाच त्यांना प्रदेशाध्यक्ष करणार हे स्पष्ट झाले होते. चव्हाण हे डोंबिवलीचे (जि. ठाणे) आमदार आहेत. एकनाथ शिंदे यांच्या महायुती सरकारमध्ये ते सार्वजनिक बांधकाम मंत्री होते. ते पक्षाचा मराठा चेहरा आहेत. अलिकडेच त्यांची पक्षाच्या संघटन पर्वाचे प्रभारी म्हणून नियुक्ती केली होती. आज त्यांची कार्यकारी प्रदेशाध्यक्ष म्हणून नियुक्ती राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी केली.



बावनकुळे यांना राज्य मंत्रिमंडळात महत्त्वाचे महसूल मंत्रिपद देण्यात आले. तसेच मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्र्यांनंतर चौथ्या क्रमांकाचे मंत्री म्हणून त्यांना स्थान देण्यात आले. भाजपमध्ये 'एक व्यक्ती, एक पद' असा नियम आहे. त्यानुसार बावनकुळे यांच्या जागी आता संघटनात्मक निवडणुकीचे सर्व टप्पे पूर्ण झाल्यानंतर रवींद्र चव्हाण हे पूर्णवेळ प्रदेशाध्यक्ष होतील. अलिकडील काही वर्षांमध्ये कोकणात भाजप मजबूत करण्याचे श्रेय त्यांना दिले जाते.

# आंबेडकरवादी पत्रकार ते वर्तमानपत्रातून अन्यायाला वाचा फोडणारा संपादक - प्रा. बालाजी जगतकर

पत्रकारितेच्या माध्यमातून शिव, शाहू,फुले, आंबेडकरी चळवळीचा प्रसार करणारा पत्रकारिता ही निमुटपणे अन्याय अत्याचार सहन करणाऱ्या माणसांना आदरणीय एडवोकेट प्रकाश जी आंबेडकर यांनी महाराष्ट्र मध्ये खरोखरच एक राजकीय वादळ निर्माण करून बहुजन समाजाला राजकीय दृष्ट्या जागृत करून इथल्या प्रस्थापित राजकारण्यांना धक्का देण्याचे काम केलं अनेक राजकारणी लोकांना नामोहरन करण्याचे काम राजकारणाच्या माध्यमातून एडवोकेट प्रकाश आंबेडकर यांनी केलेले आहे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या खरा विचार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे राजकारण जमात बनण्याचे स्वप्न जर कोणी पूर्ण करण्याचं काम करत असेल तर तेच एडवोकेट प्रकाश आंबेडकर प्रकाश आंबेडकर यांच्या या महत्त्वकांक्षी स्वाभिमानी चळवळीला पुढे नेण्याचं काम अनेक युवक करत आहेत निस्वार्थीपणाने या भारत देशामध्ये बहुजनांची सत्ता आणण्यासाठी अनेक खालच्या वर्गापासून वरच्या वर्गापर्यंत मतपरिवर्तन सत्ता परिवर्तन करण्यासाठी आगे कूच करत आहेत त्यामध्ये बीड जिल्ह्यात अनेक बहुजन समाजाचे नेते सक्रिय आहेत त्यात सर्व वरच्या नंबर मध्ये बालाजी जगतकर यांचं नाव येतेगुलामगिरीच्या जोखडातून मुक्तकरण्यासाठी प्रभावी अस्त्र आहे. याअस्त्राचा वापर सर्वसामान्यांच्या हितासाठी बहुजन समाजाच्या हितासाठी दलित, आदिवासी, भटके विमुक्त, आबला महिला, पीडित महिला, आदिवासी व आर्थिक दृष्ट्या अत्यंत दुर्बल परिस्थितीमध्ये जीवन जगणाऱ्या अनेक गोरगरीब बहुजन समाजाच्या अन्याय अत्याचारा विरुद्ध महायुद्ध पुकारणारे लेखणीच्या माध्यमातून क्षेपणास्त्र दागणारी पत्रकारिता ही खरोखरच मानवी समाजाचे उत्थान प्रसंगी सांस्कृतिक, आर्थिक दृष्ट्या विकासासाठी मदत करणारी असते. एडवोकेट प्रकाश आंबेडकर यांनी महाराष्ट्रातील राजकारणात एक नवे वादळ निर्माण केलेले आहे पारंपारिक रिपब्लिकन काँग्रेस युतीच्या राजकारणाला छेद देऊन स्वाभिमानी स्वालंबी राजकारणाची कास धरून पारंपारिक लाचारी राजकारणाला बगल देऊन जनतेमध्ये नेत्यांमध्ये कार्यकर्त्यांमध्ये नवे आत्मभान व नवा आत्मविश्वास निर्माण करण्याचे काम केलेला आहे

बहुजन समाजाची खरोखरच कल्याण करायचे असेल हीत साधायचे असेल राजकीय दृष्ट्या बहुजनाला सत्तेच आणायचा असेल, इथली धर्मांध, कर्मे कांडावर असलेली राजसत्ता उलथून त्या ठिकाणी मानवतावादी मानवी मूल्यांची जपणूक करणाऱ्या विचारांची सत्ता आणण्यासाठी आदरणीय ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीचा ज्वलंत पुरस्कार करणारा दलितांच्या बहुजनांच्या प्रश्नावर पोट तिडकीने आवाज उठवणारा पत्रकारिता ही कुणाचीही गुलाम नाही गुलामगिरी करणारी पत्रकारिता ही जास्त टिकत नाही. आणि तसल्या पत्रकारिते पेक्षा दलालगिरी, भडविगिरी केलेली बरी म्हणून स्वाभिमानी बाण्याचा बहुजन समाजाचा बुलंद आवाज पत्रकारितेच्या माध्यमातून दलित समाजाला न्याय देण्याचा प्रयत्न करणारा मनमिळाऊ स्वभावाचा अनेक मित्रांच्या कामाला येणारा. वेळ कोणतीही असो त्यावेळी साथ देणारा एक सच्चा कार्यकर्ता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारधारेचा एकनिष्ठतेने स्वाभिमानी पद्धतीने प्रसार करणारा आपल्या धारदार लेखणीच्या माध्यमातून असंख्य बड्या बड्या नेत्यांना देखील झुकवण्याचं काम करणारा निर्भीड पत्रकार



डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वप्नातील भारत बुद्धमय करण्याच्या जे विचाराला पुढे नेण्यासाठी कार्य करणारा डॉ. बाबासाहेब आंबेडकर व फुले चळवळीच्या रथाला गतिमान करण्यासाठी स्वतःचे योगदान देणारा अनेक वर्षापासून एड. प्रकाशजी आंबेडकर यांच्या महान विचारांची कास धरून त्यांचे विचार हे बहुजन समाजातल्या प्रत्येक माणसाच्या हृदयामध्ये पेरण्याचे काम करणारा बहुजन समाजाला स्थैर्य प्राप्त करण्यासाठी त्यांचे आर्थिक प्रश्न सोडवण्यासाठी सांस्कृतिक क्षेत्रामध्ये आर्थिक क्षेत्रामध्ये राजकीय क्षेत्रामध्ये प्रगती करायची असेल शैक्षणिक क्षेत्रामध्ये प्रगती करायची असेल तर इथल्या मनुवादी शासन व्यवस्थेच्यापेकडा त लाथदेऊन त्या ठिकाणी डॉ. बाबासाहेब

आंबेडकर यांच्या राज्यघटनेवर आधारित असलेले शासन निर्माण करण्यासाठी व इथली हुकूमशाही तानाशाही कायमची संपुष्टात आणण्यासाठी आदरणीय प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली सत्ता परिवर्तन करण्यासाठी इथली जुलमी राजकीय सत्ता उलटवण्यासाठी आदरणीय एड. प्रकाश आंबेडकर यांचे हात बळकट करण्यासाठी वंचित आघाडीला साथ देण्यासाठी प्रयत्न करणारा भारत देशातील अनेक वंचित पिढी त अन्यायग्रस्त अत्याचार ग्रस्त हजारो वर्षापासून गुलामगिरीचे जीवन जगणाऱ्या वंचित बहुजन आदिवासी १८ अलुटे दर १२ बलुतेदार व ओबीसी समाजाची तसेच कुणबी समाजाच्या हितासाठी आदरणीय प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली या भारत देशामध्ये एक वेळेस सत्ता आणण्यासाठी प्रयत्न करणारा प्रयत्नाची पराकाष्टा करणारा बहुजन हिताय बहुजन सुखाय या मूलमंत्र प्रत्यक्ष आणण्यासाठी प्रयत्न करण्याचा प्रयत्न करणारा आदरणीय एड. प्रकाशजी आंबेडकर यांच्या समर्थ स्वाभिमानी नेतृत्त्वाच्या मार्गदर्शनाखाली या भारत देशामध्ये सत्ता निर्मिती व्हावी येथील बहुजन समाजाला राज्य करण्याचा मान मिळावा लाचारी दलाली भडवेगिरी करणाऱ्या माणसांना बहिष्कृत करून स्वाभिमानी माणसाची फौज निर्माण करावी या उद्दतीने प्रेरित होऊन ज्या प्रकाश आंबेडकर यांनी राष्ट्रपती ते मंत्रीपदाच्या ऑफर्स ना करून स्वकर्तृत्वावर निवडणूक लढवून हरलो तरी चालेल परंतु कोणाची लाचारी नको हा बाणा ठेवून स्वाभिमानी चळवळ जिवंत ठेवणाऱ्या प्रकाश आंबेडकर यांना साथ देणारा आमचा लाडका मेव्हणा पत्रकार, संपादक, प्राध्यापक, आंबेडकरी घराण्याचा निष्ठावान कार्यकर्ता मा. बालाजी जगतकर यांना त्यांच्या १२ जानेवारी वाढदिवसा निमित्त कोटी कोटी हार्दिक शुभेच्छा..... जय भीम जय प्रबुद्ध भारत

- एड. दिलीप उजगरे, वकील
- दिवाणी न्यायालय, परळी

# अंभोऱ्याचे सपोनी मंगेश साळवे यांची अवैध धंदेविरोधात धडाकेबाज मोहीम

## मराठवाडीत पकडली ७१००० ची बेकायदेशीर देशी-विदेशी दारू

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यातील आंभोरा पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पोलीस ठाणे अंतर्गत चालू असलेले अवैध धंदेवाल्याचे चांगलेच धाबे दणाणून टाकले रोज कुठे ना कुठे अवैध दारू विक्री करणाऱ्या वर छापे मारत हजारो रुपयांची बेकायदेशीर दारू साठा जप्त करण्यात येत आहे पोलीस ठाण्याच्या हद्दीत कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी व शांतता प्रस्थापित करण्यासाठी पोलीस अध्यक्ष नवनीत कावत ,अपर पोलीस उप अधीक्षक सचिन पांडकर ,यांच्या मार्गदर्शनाखाली अंभोरा पोलीस ठाण्याचे सपोनी मंगेश साळवे यांनी अवैध धंदे विरोधात जोरदार मोहीम राबवून एकाच महिन्यात तीन लाखाच्या जवळपास बेकायदेशीर देशी-विदेशी दारू साठा जप्त करून गुन्हे दाखल केले आहेत आष्टी तालुक्यातील आंभोरा पोलीस ठाण्याचे सपोनि मंगेश साळवे ,व त्यांच्या टीमने एकाच महिन्यात अवैध धंदे विरोधात धडाकेबाज मोहीम राबवत व पोलीस खाक्या दाखवत दोन लाखाहून अधिक बेकायदेशीर देशी-विदेशी दारू जप्त भल्या भल्या महारथींची मस्ती जिरवली आहे आष्टी तालुक्यातील मराठवाडी परिसरात एका हॉटेलवर शनिवारी भर




दुपारी छापा मारून आंभोरा पोलिसांनी ७० हजार ७८० रुपयाची देशी-विदेशी कंपनीचे बेकायदेशीर दारूचा साठा पकडून संबंधितावर दारूबंदी कायदे अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे सदर कारवाई सपोनि मंगेश साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हवालदार बाबासाहेब गर्जे, लुईस पवार ,दत्ता टकले ,भरत माने ,पोना प्रशांत कांबळे, पोलीस अंमलदार शिवदास केदार, सतीश पैठणे,अमोल शिरसाट ,यांनी केली आहे

# गर्भगिरी डोंगर पट्ट्यामध्ये बिबट्याचा मुक्त संचार : परिसरातील शेतकरी भयभीत

## शेळ्याचा पाडला जातोय फडशा, वन विभागाने उपाययोजना करावी

आष्टी (प्रतिनिधी)

मागील अनेक दिवसापासून गर्भगिरी पर्वतरांगेतील डोंगर पट्ट्यात बिबट्याचे दर्शन होऊ लागल्याने शेतकरी भयभीत झाले आहेत अनेक ठिकाणी शेळ्याचा फाडसा पाडल्याचे समोर आले आहे शेतात जायचे म्हणलं तर शेतकरी जीव मोठे धरून जात आहे वन विभागाने एखादी दुर्दैवी घटना घडल्यास त्या अगोदर उपाययोजना करावी अशी मागणी शेतकरी वर्गातून होऊ लागली आहे आष्टी तालुक्यातील धानोरा हिवरा पिंपरखेड सुलेमान देवळा, गौखेल कारखेल ,चिंचेवाडी ,सावरगाव तागडखेड, मसोबावाडी ,गंगादेवी शेडाळा ,देऊळगाव घाट ,केळ पिंपळगाव, हारेवाडी ,मराठवाडी ,नांदूर विठ्ठलाचे, अंभोरा ,सालेवडगाव करेवडगाव, बीड सांगवी ,यासह अनेक ठिकाणी मागील दिवसापासून या डोंगर पट्ट्यात बिबट्याचे वास्तव्य असल्याचे समोर आले आहे रात्री अप रात्री बिबट्याचा वावर होत आहे तसेच बिबट्याचे शेतकऱ्यांना दिवसही दर्शन होत असल्याने शेतकरी भयभी झाली आहेत शिकारीच्या नादात एखादा दुर्दैवी घटना होऊ शकते याची वन विभागाने गांभीर्य ओळखून बिबट्या जिथे जिथे



वारंवार नजरेस पडतोय त्या ठिकाणी उपयोजना कराव्यात अशी मागणी अन्सार शेख यांनी केली आहे



आज गुरुवर्य भगवान महाराज सार्व वाचनालय इंद्रप्रस्थ कॉलनी बीड येथे राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले यावेळी प्रमुख अतिथी माजी उपनगराध्यक्ष व भा ज प जिल्हा सरचिटणीस ड सर्जेराव तांदळे यांनी जिजाऊ व स्वामीजींच्या प्रतिमेत पुष्पहार अर्पण करूनअभिवादन केले.यावेळी वाचनालयाचे संस्थापक डॉ राजेंद्र सानप,अमर सानप,एम डी पांचाळ,आर के भोंडवे, सुनील गायकवाड,धनंजय सानप,एच आर सानपआदिंसह असंख्य वाचक उपस्थित होते

# उपजिल्हा रुग्णालय येथे वाचादोष शस्त्रक्रिया शिबिर संपन्न

बीड - जिल्ह्यातील उपजिल्हा रुग्णालय गेवराई येथे दिनांक ११ जानेवारी २०२५ रोजी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक थोरात, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.उल्हास गंडाळ,अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ शेख रौफ, निवासी वैद्यकिय अधिकारी डॉ. लक्ष्मीकांत तांदळे, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.अभय गोंदीकर, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.सुरज कोठावळे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम अंतर्गत शून्य ते अठरा वर्ष वयोगटातील ५८बालकांची वाचादोष शस्त्रक्रिया (टंग टाय सर्जरी) शिबिर पार पडली.यावेळी जनरल सर्जन डॉ.अभिषेक जाधव यांनी शस्त्रक्रिया केली. त्यासाठी त्यांना उपजिल्हा रुग्णालयाचे डॉ.भुलतज्ञ श्रीमती डॉ.चौरे,बालरोग तज्ञ डॉ.रउफ, अधिपरिचारिका नूतून कोल्हे, आरोग्य निरीक्षक कुलकर्णी, श्री.नाजरे आदींनी मदत केली. शस्त्रक्रियेमुळे मुलांचा वाचादोष तसेच बोलण्यातील बोबडेपणा दूर होणार आहे.

शस्त्रक्रिया केल्यामुळे पालकांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून आले.शस्त्रक्रिया शिबिर यशस्वी करण्यासाठी जिल्हा कार्यक्रम समन्वयक रमेश तांगडे, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ.आंधळे डॉ.मिसाळ डॉ.शेख सिराज डॉ. अरबड डॉ. जाधव डॉ.तिडके डॉ. अंकुश डॉ.पवार डॉ.सबा तसेच औषध निर्माण अधिकारी सय्यद वसीम, प्रवीण जाधव,अमोल झिरमिटे, स्वाती करांडे,आसेफ सय्यद तसेच आरोग्य सेविका रंजना वसावे, नीलम वळवी, डोंगर लालाबाई, अर्चना गवळी, नीता शिंदे आदींनी परिश्रम घेतले.



# चौसाळा येथे शासकीय धान्य गोदाम हमालांचे विविध मागण्यासाठी काम बंद आंदोलन

बीड (प्रतिनिधी)

बीड तालुक्यातील चौसाळा येथे शासकिय धान्य गोदाम हमालाचे विविध मागण्यासाठी काम बंद आंदोलन सुरू असुन यामध्ये ऑगस्ट,सप्टेबंर, आक्टोबर,नोव्हेबंर,डिंसेबर २०२४ ची नियमित कामाची हमाली तात्काळ देण्यात यावी (२)माथाडी नियमानुसार दरमहा वेतन जमा न करणारयाकंडुन १०% दंडाची वसुल रक्कम करण्यात यावी (३)बीड शहर गोदामातील हमालाना बेकायदेशीर रित्या कामावरून कमी केल्याने त्यांना तात्काळ कामावर घेण्यात यावे व माथाडी मंडळाने नियुक्त न केलेल्या कामगाराकडुन काम करून घेतल्याने संबधीत नियुक्त कामगांराचे आर्थिक गळचेपी



होत असल्याने त्यांना त्वरित कामावर घेण्याच्या सुचना देण्यात अशी विनंती असे न झाल्यास माथाडी कायदयातील तरतूदीनुसार कार्यवाही व्हावी(४)मा.उच्च न्यायालयाने १ ऑगस्ट २०२३ रोजी माहे मार्च २०१२ पासुनचा महागाई निर्देशांकाचा फरक देण्याबाबत आदेश दिला मात्र पुरवठा विभागास वेळोवेळी अवगत करूनही फरक मिळाला नाही तात्काळ फरक देण्यात यावा (५)थेट वाहतुक टप्पा १ व २ साठी गोदामातील नियुक्त हमालांचा रोजगार कमी होत असल्याने संबधीत कंत्राटदाराने ज्या त्या गोदामातील नोंदीत हमालाकडुनच काम करून घ्यावे आदी मागण्यासाठी हे आंदोलन सुरू असुन या आंदोलनामध्ये चौसाळा येथिल हमाल मोठया संख्येने उपस्थीत होते.

# मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांचा दुहेरी सत्कार

## सामाजिक कार्यकर्त्यांनी मानले आभार

बीड (प्रतिनिधी)

शहरातील मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांचा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे यांनी दुहेरी सत्कार केला.एस.एम.युसूफ़ यांनी दिनांक ३१ डिसेंबर २०२४ रोजी पत्रकारिता क्षेत्रात ११ वर्ष पूर्ण केले. यामुळे गेल्या ११ वर्षांपासून पत्रकारिता क्षेत्रात एक मुक्तपत्रकार म्हणून देत असलेल्या योगदानाबद्दल तसेच शासनाने घेतलेल्या १०० रुपयांचा बॉण्ड बंद करून ५०० रुपयांचा बॉण्ड लागू केलेल्या निर्णयामुळे सर्वसामान्यांना बॉण्ड वापरताना आर्थिक भुर्दंड बसत होता. शिवाय ५०० रुपयाचे बॉण्ड मुद्रांक विक्रेत्याकडे मिळतही नव्हते. यामुळे एस.एम.युसूफ़ यांनी या बाबीची



बातमी प्रसिद्धी माध्यमात दिली. सदरील बातमी ही दिनांक ०९ व १० डिसेंबर २०२४ रोजी अनेक स्थानिक तसेच विभागीय वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित झाली होती. याची दखल शासन-प्रशासन दरबारी घेतली गेल्याने आता ५०० रुपयाचाच नाही तर १०० रुपयांचा बॉण्ड ही शासकीय-प्रशासकीय कामासहित कुठलेही प्रमाणपत्र काढण्याकरिता देण्याची गरज नसल्याचे निर्देश नोंदणी महानिरीक्षकांनी स्पष्टपणे काढल्याने सर्वसामान्यांना बसणारा आर्थिक फटका संपुष्टात आला आहे. या दोन्ही बाबींमुळे बीड शहरातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे यांनी एस.एम.युसूफ़ यांचा शाल, पुष्पगुच्छ देत पेढे भरवून हृदयी सत्कार करत आभार व्यक्त केले आणि पुढील कार्यासाठी मनस्वी शुभेच्छा दिल्या.

# राजमाता जिजाऊ जन्मोत्सवा निमित्त शिवकालीन मर्दानी खेळ पाहण्यासाठी उपस्थित रहा.... प्रा.सनी वाघमारे

बीड(प्रतिनिधी)

सविस्तर वृत्त असे की यावर्षी राजमाता जिजाऊ जन्मोत्सवानिमित्त प्रा. सनी वाघमारे मित्र मंडळा तर्फे बीड शहरातील क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळा



सारडा कॅपिटल या ठिकाणी दि.१२ जानेवारी २०२५ वार :- रविवार रोजी ठीक सायंकाळी ७:०० वाजता माँ जिजाऊंना मानवंदना देण्यासाठी शिवकालीन मर्दानी खेळाचे आयोजन करण्यात आले आहे . येणाऱ्या पिढीला पूर्वकालीन लढाया कशा होत होत्या या दृष्टिकोनातून आणि इतिहासाचे जतन होण्यासाठी शिव कलेच्या माध्यमातून आम्ही येणाऱ्या युवा पिढी समोर पूर्वकालीन इतिहास या कलेचा माध्यमातून सादर करत आहोत . तसेच या कलेतून मा जिजाऊंना मानवंदना देण्यात येणार आहे . तरी बीड शहरातील नागरिकांनी या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने हा शिवकालीन मर्दानी खेळ पाहण्यासाठी तसेच जिजाऊंना मानवंदना देण्यासाठी उपस्थित राहावे असे आवाहन प्रा. सनी वाघमारे मित्र मंडळांनी केले आहे.

# प्रलंबित कामे जलदगतीने पूर्ण करा जनतेच्या कामांना प्राधान्यक्रम द्या,मतदार संघात नवनवीन योजना राबविण्यासाठी अधिकाऱ्यांनी तत्परता दाखवा - आ.सुरेश धस

आष्टी (प्रतिनिधी)


गेल्या दहा वर्षांपासून आष्टी मतदार संघात प्रशासकीय यंत्रणेचा सुरू असलेला अनागोंदी कारभार माझ्या काळात मी खपवून घेणार नाही.तसेच मतदार संघातील रखडलेले प्रकल्प जलदगतीने पूर्ण कसे होतील यासह सर्वसामान्य जनतेच्या कामांना प्राधान्यक्रमाने सोडवून मतदार संघात नवनवीन योजना राबविण्यासाठी प्रशासकीय अधिकाऱ्यांनी तत्परता दाखवून विकास कामांना गती देण्याची गरज असल्याचे मत आ.सुरेश धस यांनी व्यक्त केले.

शुक्रवारी सायंकाळी ६ वाजता आष्टी पंचायत समिती कार्यालय सभागृहात बीडचे जिल्हाधिकारी अविनाशजी पाठक यांच्या प्रमुख उपस्थितीत आष्टी पाटोदा शिरूर तालुक्यातील कृषी व पाटबंधारे विभागाची आढावा बैठक घेतली.या बैठकीत , प्रलंबित खुंटेफळ साठवण तलाव योजने संदर्भात जलद गतीने पावले उचलून कामास गती देणे.वन विभागाच्या क्षेत्रावर असलेल्या ग्लिरिसिडीया या वनस्पतीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असल्याचे विदारक चित्र समोर येत असून त्या ऐवजी वड, पिंपळ आदी वृक्षांची लागवड मनरेगाच्या माध्यमातून प्राधान्यक्रमाने करणे,सिंदफणा प्रकल्पाची उंची वाढविणे,सुरत चेन्नई या महामार्गासाठी आष्टी मतदार संघातून जात असलेल्या राष्ट्रीय मार्ग-४६ रस्त्याबाबत जमीन अधिग्रहण करणे,ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये यासाठी एसटी महामंडळाच्या फेऱ्या वाढवणे तसेच मच्छिंद्रनाथ गडावर मुक्कामी बस सुरू करणे,




पिंपळा लोणी मार्गे अहमदनगर ही बस सुविधा यासह महिंदा, मोराळा, पाटसरा यासह ग्रामीण भागातील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी बस सेवा उपलब्ध करून देणे,जिल्हा परिषद,अंतर्गत कार्यरत शिक्षण विभाग, ग्रामसेवक, प्राथमिक आरोग्य केंद्र, पशुवैद्यकीय दवाखाना येथे अधिकारी कर्मचारी यांची प्रमाणित बिंदूनामावली तपासणे,जिल्हापरिषद शिक्षकांच्या रिक्त जागा भरणे, प्राथमिक पदवीधर, विस्तार अधिकारी मुख्याध्यापक पदोन्नती प्रक्रिया पूर्ण करणे,काही ग्रामपंचायत मध्ये सरपंच, ग्रामसेवक यांना विचारात न घेता बोगस सह्या करून पैसे उचलले आहेत त्यांच्यावर तत्काळ कार्यवाही करणे,सावरगांव परिसर अविकसित क्षेत्र घोषित जिल्हा परिषद लघुपाटबंधारे,जलसंधारण विभाग गावतलाव,पाझर तलाव दुरुस्ती करणे,वीज वितरण विभागाच्या टाकळी (अ)- अतिक्रमण नवीन सबस्टेशन, सोलार पंप, अतिरिक्त होणाऱ्या विदयुतदाबा बाबत निर्णय घेणे.शिराळ आणि महिंदा- येथील उपकेंद्रासाठी जागा खरेदी करणे, मोराळा येथील ४२ एकर जागेचा विचार करणे,आष्टी, पाटोदा, शिरूर (का) येथील नवीन बस स्थानक कामांचा वेग वाढवणे,

पैठण-पंढरपूर पालखी मार्ग भुसंपादन. अतिक्रमण यामुळे शिरूर का. शहर, डोंगरकिन्ही(मळेकरवाडी) पाटोदा शहर (पारगाव रोड) इ.ठिकाणी काम वन विभाग परवानगी घेऊन पूर्ण करणे,पांगरी-जाधववाडी साठवण तलाव भुसंपादन प्रक्रिया पूर्ण करणे, शेती, झाडे, पक्की विहीर यांचे मूल्य मापन पूर्ण करणे,उखळवाडी - जाटनांदूर साठवण तलाव भूसंपादन अपूर्ण असून गॉर्ज (घळभरणी) बुजवणे काम बाकी,नष्ट मालमत्तेचे मुल्यमापन करणे,सिंदफना प्रकल्प, खोलीकरण व उंची वाढविणे,सर्व क्षेत्र बागायती होणे साठी कॅनॉल दुरुस्ती करणे,वाघाचावाडा साठवण तलावाचे काम वेगाने सुरू करणे यासह विविध विषयांवर चर्चा झाली.तसेच १३ जानेवारी २०२५ पासून आष्टी मतदारसंघात व्ही रमणी आणि जरेवाडी पॅटर्न सुरू होणार असून यामुळे शाळाबाह्य होत असलेल्या ऊसतोड मजुरांची मुले मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि शिक्षण सुविधा सहज आणि सोप्या पद्धतीने उपलब्ध होण्यासाठी हा पॅटर्न अत्यंत महत्त्वाचा असून त्याची अंमलबजावणी करणे यासह विविध विषयांवर चर्चा झाली.यावेळी उपविभागीय अधिकारी कविता जाधव,उपविभाग अधिकारी पाटोदा वसिमा शेख,बीड पाटबंधारे विभाग वरिष्ठ अभियंता चिस्ती , वरिष्ठ अभियंता थोरात धाराशिव पाटबंधारे विभाग,कार्यकारी अभियंता कृष्णाजी घुगे कृष्णा खोरे, कार्यकारी अभियंता कृष्णा पानसंबळ, कार्यकारी अभियंता पवार, कार्यकारी अभियंता गलांडे ,कार्यकारी अभियंता आमले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी मोकाटे, जिल्हा परिषद बीड, जिल्हा वनसंरक्षक अधिकारी श्री गर्कळ, वनविभाग प्रादेशिक, श्री सांगोळे वन्यजीवलजल मयूर अभयारण्य, तहसीलदार श्रीमती वैशाली पाटील मॅडम, परिवहन विभाग नियंत्रक दुसाने मॅडम, मृद व जलसंधारण व अभियंता जलसंपदा उपाभियंता लाभक्षेत्र अधिकारी पोलीस निरीक्षक श्री भुतेकर यासह सर्व विभागांचे अधिकारी उपस्थित होते.



जय जिजाऊ जय शिवराय स्वराज्यजननी राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या जयंतीनिमित्त आज शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर व जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर यांनी बीड शहरातील राजमाता जिजाऊ माँसाहेबांच्या अर्धाकृती पुतळ्याला विनम्र अभिवादन केले व जिजाऊ जन्मोत्सवानिमित सर्वांना शुभेच्छा दिल्या. यावेळी तालुका प्रमुख गोरख आण्णा सिंघण, विनोद गुंड पाटील, दीपक घोडके पाटील, अजय आण्णा गायकवाड, मुकेशजी घुमरे, मनोज भैय्या डोंगरे सर्व उपस्थित होते..!!

# राजकारणातील बदल जाणणारा व सामाजसेवेतील कोहिनूर हिरा म्हणजे तुषार बोरुडे

## होतकरू १००० विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्य देण्याचा संकल्प

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : आष्टी तालुक्यातील शिरापूर येथील सामाजिक राजकीय क्षेत्रात तुषार बोरूडे अतिशय चांगले काम करत आहेत लहानपणापासूनच राजकारण - समाजकारणाची आवड . सर्वसामान्य कुटुंबातील असून , सध्याच्या राजकारणातील बदल , सर्वसामान्य जनतेच्या स्थानिक अडीअडचणी,समस्या ,त्या कसापद्धीने सोडवता येईल त्याचा सखोल अभ्यास, काम करण्याचा वेगळे पणा, कामाचे नियोजन , कामात काटेकोरपणा , माणसं जोडणे हाच धर्म समजून काम करत आहे. गरीबीची जान, सर्वसामान्य लोकांशी नाळ जोडलेली आहे. माणुसकी जपणारा युवा नेता म्हणून त्यांची



ओळख आहे. आपल्या कामाच्या वेगळ्या शैलितून आपला सामाजिक कामाचा ठसा उमटवला आहे.

समाजकराची आवड असल्याने वयाच्या अवघ्या सत्राव्या वर्षी त्यांनी जय भगवान महासंघाचे संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब सानप यांच्या मार्गदर्शनाखाली आष्टी तालुक्याच्या तालुका संघटकपदी त्यांची निवड करण्यात आली. जय भगवान महासंघाच्या सामाजिक संघटनेच्या वतीने पहिली संधी मिळाली व सामाजिक कामासाठी सुरुवात झाली. जिल्हाध्यक्ष बप्पासाहेब घुगे व आष्टी तालुकाध्यक्ष पोपट गर्जे यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही सर्वांनी गावागावात शाखा केल्या. तालुक्यात एक युवकांचे मोठे संघटन उभा करून लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेबांचे कार्य घराघरात पोहोचण्याचे काम केले.

अतिशय तळमळीने गरीबीची जाणीव ठेवून काम करण्यास सुरुवात केली. आमदार भीमरावजी धोंडे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली युवा नेते युवराज वयभासे यांनी भाजपा विद्यार्थी आघाडी आष्टी तालुका सरचिटणीस पदी २६ डिसेंबर २०१६ रोजी त्यांनी निवड देऊन जबाबदारी दिली त्या पदाला न्याय देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. पुढे श्री संत सावता माळी युवक संघाचे बीड जिल्हा सचिव म्हणून त्यांनी काम पाहिले. अनेक वेळा कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी आवाज उठवून सरकारपुढे त्यांच्यावर व्यथा मांडल्या. मराठी भाषेला मातृभाषेचा दर्जा मिळवण्यासाठी प्रयत्न केले. दारूमुळे अनेकांचे संसार मोडले जातात त्यामुळे गावात दारू बंदीसाठी आवाज उठवला. भिडेवाडा राष्ट्रीय स्मारक लवकर करावे म्हणून मागणी, गोरगरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी शालेय साहित्य वाटप केले.

# उद्योगरत्न पुरस्काराने रुपेषराजे बेद्रे पाटील सन्मानित पुणे येथे आ.दिलीप वळसे पाटील यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण

बीड(प्रतिनिधी)

पाटोद्याचे भुमिपुत्र तथा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस तथा मराठवाडा रहिवासी संघ महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष रुपेषराजे बेद्रेपाटील यांना पुण्याच्या बालाजी प्रतिष्ठानच्या वतीने उद्योगरत्न पुरस्कार २०२४ पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. स्व.सुंदरबाई बाबासाहेब पवार प्रथम स्मृतिदिना निमित्त आयोजित कार्यक्रमात माजी गृहमंत्री तथा आमदार दिलीप वळसे पाटील यांच्या हस्ते बेद्रे पाटील यांना पुरस्काराचे वितरण करण्यात आले. आरएसबी उद्योग समुहाचे अध्यक्ष रुपेश बेदरे पाटील यांनी उद्योग क्षेत्रात भरीव कामगिरी केल्याबद्दल हा पुरस्कार देण्यात आला.



बालाजी प्रतिष्ठान पुणे आयोजित स्व.सुंदरबाई बाबासाहेब पवार प्रथम स्मृतिदिनी जीवनगौरव पुरस्कार वितरण करण्यात आला. यावेळी आदर्श उद्योगपती स्वर्गीय अतुल सदाशिव पवार उद्योगरत्न पुरस्कार २०२४ पुरस्काराचे वितरण करण्यात आले. पाटोद्याचे भूमिपुत्र रुपेषराजे बेद्रे पाटील यांनी बीडच्या शिवाजी विद्यालयातून माध्यमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर पुणे येथे डिप्लोमा सिव्हिल इंजिनिअरींग पूर्ण केले. शालेय जीवनापासून सामाजिक कार्यात बेदरे पाटील यांना आवड असल्याने त्यांनी पुण्यातही शिक्षणासोबत सामाजित कार्यात सहभाग ठेवला. पुढे आरएसबी उद्योग समुहाच्या माध्यमातून व्यावसायिक प्रगती करत सामाजिक कार्य केले आणि राजकारणातही बेदरे पाटील यांनी सहभाग ठेवला. राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून राजकारणाला समाज कार्याची जोड देत त्यांनी काम सुरू ठेवले. यामुळे त्यांची राष्ट्रवादी युवक काँग्रेस महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस (अजितदादा पवार) पदी निवड करण्यात आली. या माध्यमातून युवकांची मोठी फळी उभी केली. पुढे मराठवाडा रहिवासी संघ महाराष्ट्र राज्याच्या माध्यमातून शिक्षण, आरोग्य, रोजगार उपलब्ध करुन देणे, पुणे, मुंबई सह संपूर्ण महाराष्ट्रात व दिल्ली येथे विद्यार्थ्यांसाठी मदत करण्याचे काम बेदरे पाटील करत आहेत. कोविड काळात गरजुंना अन्नधान्य वाटप, अनेक रुग्णांना वैद्यकीय मदत पोहोचविण्याचे काम केले, पोलीस बांधव, अंगणवाडी सेविका यांना सॅनिटायझर वाटपाचे उल्लेखनिय काम बेदरे पाटील यांनी केले आहे. या सोबतच हरित महोत्सवाच्या माध्यमातून दर वर्षी ९९०९ वृक्षारोपण व वाटप कार्यक्रम राबवून झाडे जगवा झाडे लावा हा संदेश लोकांपर्यंत पोहोचवून सामाजिक बांधिलकी जपली आहे. मतिमंद व अपंग मुलांना वाढदिवसाच्या निमित्ताने गणवेश वाटपाचा कार्यक्रम, पुणे जिल्हा विकास मंचच्या माध्यमातून माननीय श्री सदाशिव अण्णा पवार यांच्या नेतृत्वाखाली शासन दरबारी सातबारा नोंदीसाठी गुंठेवारी संदर्भात तसेच अनेक शेतकऱ्यांच्या पीएमआरडीए हद्दीतील येणाऱ्या अडीअडचणी सोडवण्यासाठी प्रयत्न करत आहेत. राज्यभरात ऐरणीवर असलेल्या मराठा आरक्षणासाठी उच्च न्यायालयात महाराष्ट्रातील पहिले कॅव्हेट दाखल करण्याचे कामही त्यांनी केले आहे. या सोबतच मराठा आरक्षण आंदोलनामध्ये मागील सोळा वर्षांपासून सहभाग नोंदवला आहे. सामाजिक कार्यासोबतच आरएसबी उद्योग समुहाच्या माध्यमातून रुपेश बेदरे पाटील यांनी पुण्याच्या उद्योग क्षेत्रात भरीव कामगिरी केल्याबद्दल आदर्श उद्योगपती स्वर्गीय अतुल सदाशिव पवार उद्योगरत्न पुरस्कार २०२४ देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी ह भ प पंकज महाराज गावडे, मा.आयुक्त कांतीलाल उमाप साहेब , आ.बापूसाहेब पठारे ,जेष्ठ नेते पंढरीनाथआण्णा पठारे , जि.प सदस्या सौ.कुसुमताई मांढरे , आ.माऊली आबा कटके , नगरसेवक महेंद्र पठारे ,सदाशिवआण्णा पवार , महानंद दुध डेअरी च्या संचालीका सौ.केशरताई पवार यांच्या सह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# गेवराईतील बँकेच्या फंडयामुळे पिग्मी प्रतिनिधी अडचणीत!

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : शहरातील सहकारी बँका आणि पतसंस्था मध्ये व्यवसायिकांच्या अल्पबचत खात्याच्या दैनंदिन रकमेची दुकानात जाऊन संकलन करणाऱ्या पिग्मी प्रतिनिधी वर उपासमाराची वेळ आली आहे बचत खात्याचा निधी संकलित झाला तरच या एजंटला त्या बँकेकडून तीन टक्के कमिशन मिळते त्यावरच त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो मात्र पतसंस्था चालकांकडून चेअरमन यांच्याकडून आर्थिक व्यवहारात अडचण निर्माण झाल्याने पिग्मी निधी संकलन करत असलेल्या पिग्मी प्रतिनिधी यांच्यावर संकटात सापडलेल्याची वेळ आली आहे

पिग्मी प्रतिनिधी यांनी बँकेकडे मोठ्या प्रमाणात बचत खाते काढले आहेत त्यात व्यवसायिक दररोज आपल्या जमा झालेल्या पैशातून काही ठराविक रक्कम बँकेत जमा करतात पण प्रत्येक वेळी बँकेत जाणे शक्य नसल्यामुळे हि रक्कम घेण्यासाठी बँकेने पिग्मी प्रतिनिधी नेमले आहेत पण तीन महिने झाल्याच्या नंतर ही रक्कम विना वजा परत दिले जाते परंतु काही गेवराई शहरातील बँकेमध्ये पिग्मी प्रतिनिधी म्हणून कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्याला जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न होत आहेत विशेष म्हणजे प्रत्येक खातेदारांनी आपापल्या अडचणीच्या काळात आपल्याला मदत होईल यासाठी हे पैसे बचत केले आहेत पिग्मी प्रतिनिधी यांनी बँककडे जमा केलेले रक्कम त्यांना परत मिळत नसल्यामुळे त्यांना अनेक संकटाला सामोरे जावे लागत आहे आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह भागवण्यासाठी केलेले कष्ट हे आपले वाया जातील का असा प्रश्न त्यांना पडतो मानसिक तणावाखाली आलेले पिग्मी प्रतिनिधी यांच्या दारात संबंधित खातेदार येऊन पैशाची मागणी करत आहेत मात्र संस्थाचालकाला थोडी क्यू न येता खुशाल मौज- मज्जा करताना दिसतात वारंवार संबंधित खातेदार पिग्मी प्रतिनिधी यांना पैसे मागतात परंतु गेवराई शहरातील नामांकित सहकारी बँककडून पैसे दिले जात नाहीत स्पष्ट थोडे दिवस थांबा सर्वांची पैसे दिले जातील असे वायदे देऊन दिशाभूल केली जाते काही गरीब घरातील पिग्मी करणारे तरुण वर्गाला मानसिक ताण होत असल्याने त्यांच्या छातीवर दाब वाढला आहे प्रतिनिधी यांच्या जीवाचे काही बरे वाईट झाल्यास कोण जबाबदार राहणार? या सर्व प्रकरणाकडे जिल्हाधिकारी साहेबांनी लक्ष्य घालावे अशी मागणी होत आहे.



बीड : शहरातील राजमाता जिजाऊ उद्यान येथे जयंतीनिमित्त 'तुम्ही-आम्ही बीडकर' आयोजित जिजाऊ मानवंदनेस राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर हे उपस्थित होते. याप्रसंगी राजमाता जिजाऊंच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



शिवसंग्रामच्या अध्यक्ष डॉ.ज्योतीताई विनायकराव मेटे यांच्या उपस्थितीत आज सकाळी माँसाहेब जिजाऊ उद्यान,राजीव गांधी चौक,बीड येथे राजमाता जिजाऊ जन्मोत्सव सोहळ्यास उपस्थित राहुन माँसाहेब जिजाऊंना मानवंदना देण्यात आली. त्यानंतर शिवसंग्राम भवन,नगर रोड बीड येथे माँ जिजाऊंना अभिवादन करण्यात आले, याप्रसंगी शिवसंग्रामचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# खो स्पर्धेत मुलांच्या गटात शिवशारदा पब्लिक स्कूल विजेता तर जयभवानी विद्यालय उपविजेता

## युवानेते पृथ्वीराज पंडित यांची प्रमुख उपस्थिती

गेवराई (प्रतिनिधी)

**जयभवानी आणि जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळ अंतर्गत सुरू असलेल्या क्रीडा महोत्सवात जयभवानी विद्यालय शिवाजीनगरच्या भव्य मैदानावर आयोजित केलेल्या खो-खो स्पर्धेत मुलांच्या गटात शिवशारदा पब्लिक स्कूलने विजेतेपद पटकावले तर जयभवानी विद्यालयाचा संघ उपविजेता ठरला. यावेळी जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक श्रीराम अरगडे, स्पर्धा आयोजक रणवीर पंडित, युवानेते पृथ्वीराज पंडित, महामार्ग पोलिस स्टेशनच्या पोलिस उपनिरीक्षक निरीक्षक पल्लवी जाधव यांच्यासह मान्यवर यावेळी उपस्थित होते.**

शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली चौथा क्रीडा महोत्सव गेवराई तालुक्यात मोठ्या उत्साहात सुरू आहे. क्रीडा महोत्सवाच्या सहाव्या दिवशी जयभवानी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या भव्य मैदानावर खो-खो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. मुलांच्या गटात १४ वर्ष व १७ वर्ष वयोगटात स्पर्धेमध्ये सर्व साखळी सामने झाल्यानंतर जयभवानी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय गढी विरुद्ध शिवशारदा पब्लिक स्कूल शिवाजीनगर यांच्यात अंतिम सामना झाला. यात शिवशारदा पब्लिक स्कूलच्या संघाने अप्रतिम खेळी करत जयभवानी विद्यालयाचा पराभव करून विजेतेपद पटकावले. संघातील १७ वर्ष वयोगटात सार्थक पवार, कार्तिक वाघ, रोहित चाळक, पृथ्वीराज डरफे, सौरव चव्हाण, श्रीधर साबळे, अथर्व काळे, सागर तांगडे, शांतनू राज पवार, नुमान बागवान, कृष्णा माकुडे, सार्थक दाभाडे कामगिरी केली. क्रिडाशिक्षक ज्ञानेश्वर धापसे, श्रीमती विद्या राठोड यांचे मार्गदर्शन लाभले. वयोगट १४ मध्ये शिवशारदाचा संघ विजेता ठरला. या संघात यशराज तिपाले, स्वार्थीक वाघ, सार्थक घोडके, संस्कार थावरे, यश हत्ते, स्वातंत्र्य शेळके, कार्तिक काळे, पृथ्वीराज लोणकर, विजय शिंदे, नुमान पठाण, श्रेयस तिपाले, कार्तिक घोडके, रोहन कबाडे यांनी सहभाग घेतला. त्यांना क्रीडा शिक्षक ज्ञानेश्वर धापसे यांचे मार्गदर्शन लाभले.उपविजेतेपद जयभवानी विद्यालयाच्या संघाने पटकावले. १४ वर्ष वयोगटात संघातील खेळाडू धनवडे रुद्र, वरवडे अभिषेक, पवार पवन, तळतकर सार्थक, आरसूळ ऋषिकेश, आजबे सक्षम, चौधार विराट, चव्हाण प्रिन्स, जाधवर संस्कार, तिवारी सुरज, चौधरी समर्थ, मनोहर जयवंत या विद्यार्थ्यांचा सहभाग होता. १७ वर्ष वयोगटात मुलेलोणकर सचिन, सपकाळ समर्थ, वाळेकर पवन, पवार अभिषेक,राऊत ओमकार, सातपुते सुमित, जाधव



धनराज, येवले कुणाल, जाधव निखिल, घाटे सुजल, चोरमले सुरज, जाधव युवराज,भावले महादेव यांनी उत्कृष्ट कामगिरी करत उपविजेतेपद पटकावले. त्यांना मुख्याध्यापक वसंत राठोड, क्रीडा शिक्षक गिरी, आडे आणि रमेश देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले.

तृतीय विजेता ठरला शारदा विद्या मंदिर गेवराईचा संघ. १४ वर्ष वयोगटात जाधव ऋषिकेश, काळे कृष्णा,मोटे हर्षद, पघळ राजवर्धन, नवले प्रथमेश, शिंदे शौर्य, उंछैया सार्थक, काकडे हर्षवर्धन, हिंगे श्रवण, राठोड शिवम, सागडे संजय, तारक आदित्य या खेळाडूंचा समावेश होता तर १७ वर्षे गटात कर्हे मोहित, खेडकर शिवम, जाधव रोहन, मडावी पियुष, बोराडे क्षितिज, चव्हाण पृथ्वीराज, कापरे सुबोध, शेख साकीब, चव्हाण प्रताप, म्हेत्रे सार्थक, कातकडे प्रथमेश नाटकर, कार्तिक संतोष यांनी चांगली कामगिरी केली. त्यांना मुख्याध्यापक पवार, क्रिडा शिक्षक पघळ यांनी मार्गदर्शन केले.

स्पर्धेचे पंच म्हणून रोहित आडे , अभिजीत हिवाळे, भरत यादव, रोहित घिगे, सिंधू माने, गणेश यादव, नवनाथ चव्हाण, विष्णुपंत घोंगडे, वेदांत काळे, प्रा. बोरवडे, देविदास गिरी, गणपत डोंगरे, विजय जाहेर, विजय अपसिंगेकर यांनी काम पाहिले. सर्व विजेत्यांना आयोजक रणवीर पंडित व युवानेते पृथ्वीराज पंडित यांनी अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेचे सर्व मुख्याध्यापक, प्राचार्य, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सापा पासून दक्षता बाळगा जिव घेऊ नका - सर्पमित्र निमेश चिद्रवार

धारूर / प्रतिनिधि

धारूर येथील सर्पमित्र निमेश चिद्रवार यांनी ज्ञानदीप विद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष घोपस जातीचा पकडलेला विषारी साप दाखवत या भागा आढळणारे विषारी बिनविषारी सापाचे बद्दल मार्गदर्शन केले सापा बद्दल मनात भिती बाळगूनये साप दिसला तर तात्काळ सप़र्क करा त्याच़ा जिव घेऊ नका असे अवाहण ही केले.



धारूर तालुक्यातील ज्ञानदीप प्राथमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना सर्पमित्र निमेश चिद्रवार स यांनी प्रत्यक्ष त्याऩी पकडलेला विषारी घोणस जातीचा साप दाखवत मार्गदर्शन. केले. यावेळी निमेश चिद्रवार स यांनी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष साप दाखवला त्या सापाविषयी सविस्तर माहिती सांगत सापाचे प्रकार, विषारी - बिनविषारी साप, अंडे देणारे साप, पिलांना जन्म देणारे साप, परिसरातील साप यांच्या विषयी सखोल माहिती सांगत मार्गदर्शन केले सापांना पकडण्या साठी लागणारे साहित्य दाखवण्यात आले. तसेच वन्यजीवांना जीवनदान देण्याचे विद्यार्थ्यांना आव्हान केले. आता पर्य़त ९२सापाला आपण जिवनदान दिल्याचे साग़ीतले सापा पासून घ्यायचे काळजी बद्दल माहीती दिली यावेळी सर्पमित्र निमेशजी चिद्रवार , संचालक शैला महाजन , शेख एस एस , सर्व शिक्षक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते




कडा - राजमाता जिजाऊ माँ साहेब व स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त अभिवादन करताना जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा कडा नंबर १ चे प्रभारी मुख्याध्यापक संजय सरडे, प्रशांत दगडे, दादा पवार, नितीन करडुळे, योगेश खेडकर, गोवर्धन नन्नवरे,श्रीमती मीना जोशी, मीरा बर कसे, सुनिता बाहुले व आदी शिक्षक वृंद दिसत आहेत.

# बॅडमिंटन स्पर्धेत शारदा विद्या मंदिरचा साईराज हिंगे प्रथम तर जयभवानीची आदिती कानडे प्रथम

गेवराई (प्रतिनिधी)

जयभवानी व जगदंबा शिक्षण संस्थेच्या अंतर्गत सुरू असलेल्या क्रीडा महोत्सवात जयभवानी विद्यालयात घेण्यात आलेल्या बॅडमिंटन स्पर्धेमध्ये मुलाच्या गटात शारदा विद्या मंदिरच्या साईराज हिंगे याने प्रथम तर जयभवानी विद्यालयाच्या आदिती कानडे हीने मुलीच्या गटात प्रथम क्रमांक पटकावला. युवानेते पृथ्वीराज पंडित व रणवीर पंडित यांनी सर्व विजेत्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

शारदा स्पोर्ट्सचे अकॅडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांच्या संकल्पनेतून सुरू असलेल्या क्रीडा महोत्सवामध्ये बॅडमिंटन स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते. शिवाजीनगर गढी येथील जयभवानी विद्यालयात या स्पर्धा मोठ्या उत्साहात संपन्न झाल्या. भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांच्या हस्ते बॅडमिंटन स्पर्धेचे उद्घाटन झाले या स्पर्धेमध्ये १८ शाळेचे संघ सहभागी झाले होते. दिवसभर झालेल्या साखळी स्पर्धेत स्पर्धेनंतर अंतिम सामन्यात मुलाच्या गटात शारदा विद्यामंदिर च्या साईराज हिंगे याने प्रथम तर युवराज हिंगे यांने द्वितीय क्रमांक मिळवला शिवशारदा पब्लिक स्कूलच्या स्वराज चव्हाण याने तृतीय क्रमांक पटकावला. मुलीच्या गटामध्ये जयभवानी विद्यालयाच्या आदिती कानडे या विद्यार्थिनीने प्रथम, शिवशारदा पब्लिक स्कूलच्या श्रावणी डावकर हिने द्वितीय तर शारदा विद्या मंदिर गेवराईच्या चैत्राली कुलकर्णी हीने तृतीय क्रमांक पटकावला.

स्पर्धेचे पंच म्हणून आदित्य ससाणे, हर्ष कुकडेजा, यश चंदनशिव, करण चौधरी, शुभम घारगे, कृष्णा वेदपाठक



डॉ बाळासाहेब सरपते यांनी काम पाहिले. सर्व विजेत्यांना मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये पारितोषिके वितरित करणार असल्याची माहिती स्पर्धा आयोजन रणवीर पंडित यांनी यावेळी दिली. अंतिम सामना प्रसंगी युवा शनेते पृथ्वीराज पंडित यांच्यासह जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेचे सर्व मुख्याध्यापक, क्रीडा शिक्षक, क्रीडाप्रेमी नागरिक आणि खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती पाटोदा नगरपंचायत कार्यालयात मोठ्या उत्साहात साजरी

पाटोदा (प्रतिनिधी)

हिंदवी स्वराज्य साकारण्यासाठी शर्थीने प्रयत्न करणाऱ्या राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब व तरुणांसाठी प्रेरणास्तोत्र आध्यात्मिक जीवनाचा उद्देश फक्त आध्यात्मिकता नव्हे,तर समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात परिवर्तन आणणे आसुन 'तुम्ही जे ठरवाल ते बनू शकता' ह्या विश्वासाने तरुण पिढीला आपले ध्येय साध्य करण्याची प्रेरणा देणारे स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमित्त पाटोदा नगरपंचायत कार्यालयांमध्ये युवानेते सागर धस यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अजरामर स्मृतीस विनम्र अभिवादन केले. जगालाही हेवा वाटेल,असे रयतेचे राज्य घडविणाऱ्या आणि स्वराज्याची ज्योत चेतवणाऱ्या, माँसाहेब जिजाऊ यांनी शेतकरी, कष्टकरी जनतेला पाठबळ देऊन स्वराज्याच्या रूपाने सुशासन प्रस्थापित करण्याचे महानकार्य केलेजगातील महापराक्रमी आणि आदर्श छत्रपती घडवणारी आदर्श माता राजमाता



जिजाऊ व तरुण पिढीला आपले ध्येय साध्य करण्याची प्रेरणा देणारे स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमित्त कोटी कोटी वंदन करताना युवानेते सागर धस, नगराध्यक्ष राजू भैय्या जाधव, नगरसेवक संतोष दादा जाधव, सभापती रामेश्वर गोरे,सुनील वाघमारे,युवानेते भैय्यासाहेब घुमरे, जाधव सर,पत्रकार गणेश शेवाळे, राज खवळे,बापु शेवाळे,संदीप नाईकनवरे,जयप्रकाश घुमरे यांच्यासह पाटोदा नगरपंचायतचे सर्व कर्मचारी व भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते




# ना. पंकजाताई मुंडेंच्या उपस्थितीत परळीत भाजप सदस्यता महा अभियानाची बैठक

## प्रत्येक बुथ प्रमुखांनी अधिकाधिक सदस्य करण्यासाठी जोमाने काम करण्याचे केले आवाहन

परळी । प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टी जगात क्रमांक एकचा पक्ष आहे. या पक्षाची विचारधारा समाजातील सर्व सामान्य लोकांपर्यंत घेऊन जाण्यासाठी संघटन पर्व अंतर्गत जास्तीत जास्त सदस्य आपल्याला करायचे आहेत, त्यासाठी प्रत्येक बुथ स्तरावरील कार्यकर्त्यांनी जोमाने काम करावे असे आवाहन राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज येथे केले.

भाजपच्या सदस्यता महाअभियान अंतर्गत आज परळी मतदारसंघातील शक्ती केंद्रप्रमुख आणि प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक अक्षता मंगल कार्यालयात झाली, त्यावेळी त्या बोलत होत्या. भारतीय जनता पक्ष हा जगातील सर्वात शक्तिशाली व मजबूत संघटन असलेला राजकीय पक्ष आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आपण देशभर चांगले काम करत आहोत. सर्व सामान्य जनतेचे हित लक्षात घेऊन योजना अंमलात आणत आहोत. आगामी काळात पक्षाचा विस्तार अजून वाढविण्यासाठी सर्वांना अधिक जोमाने काम करायचे आहे. समाजाच्या सर्व स्तरातील घटकांतील लोक पक्षात आले पाहिजेत यासाठी सदस्यता महा अभियान सध्या देशभर राबविण्यात येत आहे, याचाच एक भाग म्हणून बुथ स्तरावरील प्रत्येक कार्यकर्त्यांनी किमान दोनशे नवीन सदस्य करावेत असे आवाहन ना. पंकजाताईंनी केले. मी आता राज्यात मंत्री आहे, हे पद माझ्यासाठी फक्त जनतेच्या सेवेसाठी आहे. जनतेचे प्रश्न सोडविण्या बरोबरच संघटनात्मक बांधणी देखील तितकीच महत्वाची आहे असंही त्या म्हणाल्या.


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT